Peer Reviewed Refereed and UGC Listed Journal (Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume - XI, Issue - II
April - June - 2022
Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2020 - 6.306
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - XI Issue - II April - June - 2022

MARATHI PART - I

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2020 - 6.306
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# EDITORIAL BOARD


| | |
|---|---|
| **Professor Kaiser Haq**<br>Dept. of English, University of Dhaka,<br>Dhaka 1000, Bangladesh. | **Roderick McCulloch**<br>University of the Sunshine Coast,<br>Locked Bag 4, Maroochydore DC,<br>Queensland, 4558 Australia. |
| **Dr. Ashaf Fetoh Eata**<br>College of Art's and Science<br>Salmau Bin Adbul Aziz University. KAS | **Dr. Nicholas Loannides**<br>Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,<br>Faculty of Computing, North Campus,<br>London Metropolitan University, 166-220 Holloway Road,<br>London, N7 8DB, UK. |
| **Muhammad Mezbah-ul-Islam**<br>Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of<br>Information Science and Library Management<br>University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh. | **Dr. Meenu Maheshwari**<br>Assit. Prof. & Former Head Dept.<br>of Commerce & Management<br>University of Kota, Kota. |
| **Dr. S. Sampath**<br>Prof. of Statistics University of Madras<br>Chennari 600005. | **Dr. D. H. Malini Srinivasa Rao**<br>M.B.A., Ph.D., FDP (IIMA)<br>Assit. Prof. Dept. of Management<br>Pondicherry University<br>Karaikal - 609605. |
| **Dr. S. K. Omanwar**<br>Professor and Head, Physics,<br>Sat Gadge Baba Amravati<br>University, Amravati. | **Dr. Rana Pratap Singh**<br>Professor & Dean, School for Environmental<br>Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar<br>University Raebareily Road, Lucknow. |
| **Dr. Shekhar Gungurwar**<br>Hindi Dept. Vasantrao Naik<br>Mahavidyalaya Vasarni, Nanded. | **Memon Sohel Md Yusuf**<br>Dept. of Commerece, Nirzwa College<br>of Technology, Nizwa Oman. |
| **Dr. S. Karunanidhi**<br>Professor & Head,<br>Dept. of Psychology,<br>University of Madras. | **Prof. Joyanta Borbora**<br>Head Dept. of Sociology,<br>University, Dibrugarh. |
| **Dr. Walmik Sarwade**<br>HOD Dept. of Commerce<br>Dr. Babasaheb Ambedkar Marathwada<br>University, Aurangabad. | **Dr. Manoj Dixit**<br>Professor and Head,<br>Department of Public Administration Director,<br>Institute of Tourism Studies,<br>Lucknow University, Lucknow. |
| **Prof. P. T. Srinivasan**<br>Professor and Head,<br>Dept. of Management Studies,<br>University of Madras, Chennai. | **Dr. P. Vitthal**<br>School of Language and Literature<br>Marathi Dept. Swami Ramanand<br>Teerth Marathwada University, Nanded. |

# EDITORIAL BOARD

**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Sadique Razaque**
Univ. Department of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Prof. Ram Nandan Singh**
Dept. of Buddhist Studies University of Jammu.

**Dr. Safiqur Rahman**
Assistant Professor, Dept. of Geography,
Guwahati College Bamunimaidam, Guwahati,
Assam.

**Dr. Pandit Nalawade**
Principal,
Pandit Jawaharlal Nehru Mahavidyalaya,
Aurangabad.

**Dr. L. U. Meshram**
Professor & Head, Dept. of Political Science,
Pt. J. N. Mahavidyalaya, Aurangabad.

**Mr. Digambar Gangavane**
Associate Professor & Head,
Dept. of Public Administration,
Pt. J. N. Mahavidyalaya, Aurangabad.

**Mr. Sarjerao Bansode**
Associate Professor,
Dept. of History,
Pt. J. N. Mahavidyalaya, Aurangabad.

**Dr. Baliram Katare**
Professor & Head,
Dept. of Political Science,
Badrinarayan Barwale College, Jalna.

**Dr. Pandurang Dapke**
Associate Professor & Head,
Dept. of Economics,
Pt. J. N. Mahavidyalaya, Aurangabad.

**Mr. Vikram Bhutekar**
Assistant Professor,
Dept. of Sociology,
S. D. Mahavidyalaya, Soegaon, Aurangabad.

**Dr. Vilas Awari**
Professor & Head,
Dept. of Political Science,
K. J. Somaiya College, Kopargaon.

**Dr. Jyoti Adhane**
Assistant Professor & Head
Dept. of Commerce,
Pt. J. N. Mahavidyalaya, Aurangabad.

**Dr. Vilas Aghav**
Professor & Head,
Dept. of Political Science,
Adarsh Mahavidyalaya, Hingoli.



**PUBLISHED BY**

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | भारतीय संघराज्यवाद सहकार्य आणि संघर्ष<br>**प्रा. शरद अर्जुन वाघ** | ६१-६९ |
| १४ | भारतीय संघराज्यवाद : सहकार्य आणि संघर्ष<br>**प्रा. डॉ. प्रिया भा. बोचे** | ७०-७४ |
| १५ | राष्ट्र उभारणीत प्रशासनाची भूमिका<br>**डॉ. प्रमोद चव्हाण**<br>**प्रा. षाजी सहदेव** | ७५-७७ |
| १६ | तीन कृषी कायदे आणि शेतकरी आंदोलन<br>**डॉ. राम प्र. थाटे**<br>**डॉ. अर्चना शिवाजी वाघमारे** | ७८-८२ |
| १७ | राष्ट्र उभारणीत प्रशासनाची भूमिका<br>**भगवान राजेभाऊ गंडे** | ८३-९१ |
| १८ | भारतीय संघराज्यवादः सहकार्य आणि संघर्ष<br>**अर्चना कटारे**<br>**प्रा. डॉ. आर. व्ही. मस्के** | ९२-९७ |
| १९ | भारत आणि संयुक्त राष्ट्र सुधारणा : संधी आणि अडथळे<br>**अनिता पोपटराव गोरे**<br>**प्रा. डॉ. पंडित एस. नलावडे** | ९८-१०२ |
| २० | लोकशाहीतील चार स्तंभ संतुलन आणि संघर्ष<br>**मिलींदकुमार एस. मघाडे** | १०३-१०७ |
| २१ | भारतीय लोकशाहीमधील मूलभूत हक्कांचे महत्त्व : एक अभ्यास<br>**सचिन प्रकाशराव देशमुख**<br>**डॉ. आर. व्ही. म्हस्के** | १०८-११३ |
| २२ | भारत पाक संबंध : विशेष संदर्भ सियाचीन ग्लेशियर<br>**विश्वास दामोधरराव तळेकर** | ११४-११८ |

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com)** **CC-17**

# १४. भारतीय संघराज्यवाद : सहकार्य आणि संघर्ष

**प्रा. डॉ. प्रिया भा. बोचे**
संत भगवान बाबा कला महाविद्यालय, सिंदखेडराजा.

**प्रस्तावना**

'भारत हा राज्यांचा संघ होईल' या कलमाने भारतीय घटनेचा प्रारंभ होतो. 'संघराज्य' या शब्दाचा उल्लेख घटनेत कुठेही नाही. भारताचा प्रचंड मोठा भौगोलीक आकार, प्रचंड लोकसंख्या, भाषिक, आर्थिक, सांस्कृतिक विविधता या सर्वांना एकसंघ ठेवण्याचा वारसा यामुळे भारतात संघराज्यरचना हाच योग्य प्रकार होता. एककेंद्री राज्य व्यवस्थेचा प्रकार येथे शक्य नव्हता. १९३५ च्या कायद्याने प्रांतिक स्वायत्ततेची सुरूवात केली असली तरी मौर्यांपासून मुगलांपर्यंत अनेक साम्राज्यातही प्रांतांना स्वायंत्तता उपभोगता येत होती. तरी पण १९४५ च्या कायद्याचा प्रभाव जास्त होता असे डब्ल्यु.एस. मॉरिस जॉन्स म्हणतो, भारतावर हजारो वर्षे विविध परकीय सत्तेचे वर्चस्व होते यामध्ये प्रामुख्याने फ्रेंच, डच, पोर्तुगीज, शक, मौर्य, चालुक्य, मुगल व इंग्रज त्यामुळे भारताचे शासन व प्रशासनावर वरील सर्व शासकांचा प्रभाव पडला आहे. महाभारत काळ व कौटील्य काळात सुध्दा काही प्रमाणात ही व्यवस्था अस्तीत्वात होती.

भारताला स्वातंत्र्यप्राप्ती नंतर घटना समितीद्वारा निर्मित घटनेनुसार सांसदीय शासनाला सुरूवात झाली. बहूकेंद्री सत्तेकडे स्वाभाविकच कल होता म्हणून भारतीय घटनेत केंद्र व राज्यात सत्तेचे विभाजन केले आहे. केंद्रोत्सर्गी व केंद्रानुवर्ती अशा प्रवृत्तीचा मेळ साधून राष्ट्रैक्य बळकट करणे आणि केंद्र व घटक राज्ये यांच्या सुसंवादाद्वारे संविधानाची सर्व उद्दीष्ट्ये पूर्ण करणे संघराज्याद्वारे शक्य आहे. यावर संविधान सभेत फारसे मतभेद नव्हते. भारतीय संघराज्याच्या वैशिष्ट्यांवर अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया या संघराज्य व्यवस्थेचा प्रभाव आहे, असे असले तरी भारतीय संघराज्य व्यवस्था निर्माण करतांना बरेच बदल केले आहेत. म्हणूनच जगाच्या अनुभवापेक्षा वेगळा अनुभव भारतीय संघराज्य व्यवस्थेत दिसून येतो.

**भारतीय संघराज्यांचा अर्थ व स्वरूप**

घटक राज्याच्या हक्काचे रक्षण करून राजकीय एकात्मता साधणारी राजकीय यंत्रणा म्हणजे संघराज्य. केंद्र सरकार, राज्य सरकार व स्थानिक शासन एकच ध्येय धोरण सामुहीकरित्या राबवितात, हे करत असतांना तिन्हीही सरकार एक दुसऱ्याला सहकार्य करतील, केंद्र सरकार राज्य सरकारला अर्थ सहाय्य करेल. संघराज्य म्हणजे अधिकार वाटपांची अशी व्यवस्था ज्यात एक सर्वसाधारण शासनाचे घटक पातळ्या निर्माण केल्या जातात. देशातील केंद्रीय सरकार आणि प्रादेशिक सरकारे यांच्यात संविधानाने अधिकार विभागणी करून दिलेली व्यवस्था असते तिला संघराज्य व्यवस्था म्हणतात.

अमेरिकन संघराज्य हे आदर्श संघराज्य होय. भारतीय संघराज्य या अर्थाने दिसत नाही, म्हणुनच या संघराज्याला अर्थ संघराज्य, सहकारी संघराज्य, सादृश संघराज्य असे टिकाकार म्हणतात. संविधान निर्माण कालखंडात असलेल्या परिस्थितीचा प्रभाव निश्चितच भारतीय संघराज्यावर पडला. फाळणीमुळे दंगली, मृत्यूचे तांडव, निर्वासितांची संख्या, विस्तापीत, भिती, दुःख, अमानुषता, क्रौर्य, कायदा व सुव्यवस्था, सुडाची भावना, लुट, हत्त्या, संघटित व पूर्वनियोजित दंगली, आबाल वृध्दांची असहाय्यता यामुळे भारतीय घटनाकारांनी संघराज्याचा दृढ आदर्श, सैध्दांतिक चौकट स्विकारून तिच्यात ही व्यवस्था बसविण्याचा प्रयत्न केला नाही तर तत्कालीन भारताची वस्तुस्थिती व समस्यांच्या अनुषंगाने संघराज्य रचना उभी केली. या रचनेत केंद्र सरकार विलक्षण अधिकार संपन्न केले, शक्यता व आवश्यकता या दृष्टीने प्रबल केंद्र शासन घटनाकारांना स्विकारावे लागले, केंद्र सरकारला अधिकाराच्या बाबातीत झुकते माप देण्याचे कारण पाकिस्तान निर्मिती होय. प्रादेशिक राजकीय पक्षांच्या अनुपस्थितीमुळे केंद्राला प्राधान्य देण्याचे घटना समितीचे कार्य सुलभ झाले.

जातीय पिसारपणाला आवर घालणे, पाकिस्तान धार्जिणीपणामुळे त्यांचेवर जरब बसविणे, बंगाल मधील अराजकता व दहशतवाद, तेलंगणातील साम्यवादी उठाव अन्नाची कमतरता, किमान गरजा पूर्ती करणे, अशा भिषण परिस्थितीचा सामना करण्याकरीता प्रबळ व शक्ती संपन्न संघ सरकार असणे आवश्यक होते. जगातील कोणत्याही संघराज्यापेक्षा अधिक केंद्रीकरण भारतीय संघराज्यात आढळते. केंद्र सरकारला दिलेल्या अधिकाराची यादी (केंद्र सुची) इतर दोन याद्यापेक्षा प्रदीर्घ व समावेशक आहे. तर केंद्र व राज्याच्या सामाईक यादीबाबत केंद्राचे श्रेष्ठत्व घटनेने प्रस्तापित केले आहे. तसेच राष्ट्रहीताच्या दृष्टीने आवश्यक वाटल्यास राज्यसभेच्या २/३ बहूमताने संसदेला कायदा करण्याचा अधिकार घटनेच्या २४९ कलमान्वये दिला आहे, तसेच २५२ कलमान्वये राज्य विधिमंडळाने एखाद्या बाबीचे नियमन संसदेने करावे असा ठराव केल्यास त्या राज्यापुरता अधिकार केंद्रात प्राप्त होतो. २५३ कलमान्वये तह व करार पालनाकरीता जे इतर राष्ट्रा सोबत केले आहेत त्याकरीता कायदा करण्याचा अधिकार प्राप्त आहे. २४८ कलमान्वये समवर्ती सुची व राज्यसुचीत नमुद नसलेल्या कोणत्याही बाबीसंबंधी कायदा करण्याची संसदेला पूर्ण सत्ता आहे. यावरून असे स्पष्ट होते की, इतर संघराज्यापेक्षा भारतीय संघराज्यात केंद्रीकरण जास्त आहे हे नाकारता येत नाही, परंतु ती इथल्या राजकीय व्यवस्थेची गरज होती.

**सहकारी संघवाद**

केंद्र व राज्य सरकारने देश विकासाकरीता एकत्रीतपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. म्हणूनच एकसमान पातळीवर केंद्र व राज्याने जनहिताकरीता कार्य करणे गरजेचे असते. सर्व घटक राज्याने राष्ट्रविकासाची धोरणे राबवितांना सहकार्य करावे. केंद्राची धोरणे राबविणे व त्याची अंमलबजावणी करणे हे भारतीय संघराज्याचे मुळ आहे उदा. GST, NAM, Land Reforms, Model APMCs Act, 73rd and 74th, CAA/Centre-State, Investment Agreement (CSIA) and the 14th Finance Commission 42% devolution.

निती आयोगाने भारताकरीता सहकारी संघराज्यवादाबाबत निश्चित ध्येय मांडणी आहेत, त्यानुस सशक्त देश असे एक उत्कृष्ट व्यासपिठ निर्माण करून दिला, ज्याद्वारे सर्व घटक राज्यांनी एकत्र येवून भारताच्या विकासाची ध्येय धोरणे राबवावी. यामध्ये घटक राज्याचे सर्व मुख्यमंत्री मदत करतील हे पंतप्रधान, कॅबिनेट मंत्री, मुख्यमंत्री यांनी राष्ट्रीयदृष्ट्या महत्तवाचे मुद्दे विचारार्थ घेवून देश हिताचे, देश ि घ्यावेत, ध्येय धोरणे निश्चित करावे असे अपेक्षित आहे. मागासलेल्या जिल्ह्याकरीता विशेष प्रकल्प रा अपेक्षीत आहे व या सर्वांकरीता आवश्यक तांत्रिक ज्ञान व सहकार्य निती आयोगाद्वारे करण्यात येईल.

यावरून सहकारी संघराज्यवाद म्हणजे अशी संकल्पना जी केंद्र व सरकारची अशी योजना उ ज्याद्वारे समस्यांची सोडवणूक दोन्ही सरकारे आपसी सहकार्याने सोडवतील. दोन्ही सरकार एक सहयोगात्मक संबंध प्रस्तापित करतील यामध्ये असे गृहीत तत्व आहे की, केंद्र व राज्य यात श्रेष्ठ क राहणार नाही. भारतीय संविधानाने सुध्दा केंद्र सरकार व राज्य सरकारच्या परस्पर सहयोगावरच अधिक घटनाकारांनी सहयोग व समन्वयावर आधारित संघ प्रणालीची कल्पना केली होती. भारतात संवैधानिक सहकारी संघवादी संस्था विकसित केल्या आहेत. शासकीय कार्यशैलीतून सहकारी प्रवृत्तीचा निरंतर वि सहकारी संघवादाला विकसित करण्याकरीता काही व्यवस्थांचे महत्व अबादीत आहे. यामध्ये प्रामुख्याने ' वर्तमान काळात, निती आयोग, राष्ट्रीय विकास परिषद, वित्त आयोग, नियंत्रक व महालेखा परिक्षक, आंतरराज्य परिषद, एकल न्यायिक व्यवस्था, अखिल भारतीय सेवा, अशाप्रकारे भारतीय शासन व्यवस्थे व्यवहारात सहयोग आणि समन्वयाची सूत्रे विद्यमान आहेत. नवीन गठीत निती आयोगाद्वारे मुख्यमंत्री व म माध्यमे आहेत, जे सहकारी सद्‌भावनात्क संस्कृतीला योग्य रूप देण्यास सक्षम आहेत तर ७३ व ७४ भारतीय सहकारी संघराज्यवादाची मुळे अजुनच घट्ट केली आहेत.

**भारतीय केंद्र राज्य संबंधातील ताण-तणाव**

कोणत्याही देशातील घटनात्मक रचना जगाच्या तशा प्रत्यक्षात होत नाहीत काही प्रमाणात ब सिध्दांत आणि व्यवहार यात अंतर पडते. ताण तणावाला नियोजन हा घटक कारणीभूत असतो, १९५० यात फार समस्या निर्माण झाल्या नाहीत. कारण केंद्र व राज्य पातळीवर एकाच राजकीय पक्षाचे शासन ह संयुक्त सरकारे व आघाडी सरकारे अस्तित्वात आली. यातून प्रादेशिक राजकीय पक्षांचे महत्त वाढीस लाग संबंध ताणले जावू लागले. यातून स्वायत्ततेची मागणी करण्यास घटक राज्यांनी सुरूवात केली तर घटक घटना दल अधिकाराची जाणीव झाली. घटनेच्या सातव्या परिशिष्टातील सूचीमध्ये काहीही असले तरी मध्य वर्चस्व होते. आंतरराज्य तंट्यांची/वादाची सोडवणूक वैधानिक मार्गाशिवाय राजकीय मार्गाने सोडविल्या ज

प्रश्न चिघळले, त्यातून केंद्र व राज्य सरकार दरम्यान तणाव वाढीस लागले. यामध्ये राज्यपालपद, आर्थिक मदत, राज्याच्या स्वायत्ततेची मागणी, नद्यांचा पाणी प्रश्न, असे वाद निर्माण झाले व त्यातून केंद्र राज्य संबधात तणाव निर्माण झाले.

१९७१ नंतर श्रीमती इंदिरा गांधीच्या नेतृत्त्वात केंद्र राज्यात प्राबल्य निर्माण झाले तरीही तणाव संपुष्ठात आले नाहीत. यामध्ये मुख्यमंत्र्यांची निवड, संजय गांधी कडून मुख्यमंत्र्यांचा तोजोभंग/पाणउतारा हे सुरूच होते त्यानंतर जनता पक्षाच्या सरकारातही केंद्र राज्य संबंधात फार मौलिक फेरबदल झाले नाहीत. १९८० नंतर इंदिरा गांधी पुन्हा बहुमताने सत्तेत आल्या व केंद्रीकरणाच्या प्रवृत्ती शिगेला पोहचल्या. संसाधनाची केंद्रीकरण प्रवृत्ती केंद्र सरकारच्या पाठीशी सामर्थ्यात प्रचंड भर घालते. उदा. प्रतिबंधक स्थानबध्दतेचा राष्ट्रीय सुरक्षा कायदा, सीबीआय, ईडी, एनसीबी इत्यादी त्यामुळे केंद्र राज्यात जो सलोखा व सहकार्य भावना होती ती नष्ट झाली. त्यातून सोयीच्या राजकारणाला प्रचंड वाव मिळाला. त्या नंतरच्या काळात विकेंद्रीकरणाचा उदोउदो व राज्य सरकारांना डावलने असे धोरण होते. नरसिंहराव सरकारने सुध्दा मागील धोरण पुढे अवलंबविले.

२०१४ नंतर केंद्रीय पातळीवर भाजपचे सरकार सत्तारूढ झाले. येथेही वस्तु व सेवा कर कायद्याच्या अंमलबजावणीतील धोरण, केंद्रीय सुरक्षा दलांची राज्यातील व्याप्ती वाढविणे, केंद्र सरकारच्या अखत्यारितील गुन्हा अन्वेषण विभाग (सीबीआय) सक्त वसुली संचालनालय (इडी) अंमली पदार्थ नियंत्रण विभाग (एनसीबी), जी.एस.टी. कायदा अंमलात आल्यापासून केंद्र व राज्यसरकार यांच्या महसुल वाटपात मतभेद आहेत. काही राज्ये मतभेद उघडपणे व्यक्त करतात तर काही (भाजपाशासित) राज्ये बंद खोलीत छुपा पण मतभेद आणि वाढ जरूर आहेत. रिझर्व बँकेतील 'रिझर्व ठेव' संकटाच्या आधीच काढून घेणे व गव्हर्नरनी विरोध केल्यास त्यांना पदावरून दूर करण्याची परिस्थिती निर्माण करणे, कोरोना सारख्या भयंकर महामारीच्या काळात राज्य आर्थिक संकटात असतांना हात वर करायचे हा संघराज्य व्यवस्थेतील विरोधाभास होय. तामिळनाडू सरकारने वैद्यकीय परिक्षा नीटबाबत विरोध करणे, केंद्र सरकारचा उद्देश संघ सरकार असा करणे.

**संघराज्यवादाचे बदलते स्वरूप**

संघराज्यात केंद्र व राज्य सरकारात अधिकाराचे विभाजन असले तरीही परस्परांवरील प्रभाव, अनुमय वाटाघाटी, सौदंबाजी, यातून सार्वजनिक हिताच्या ध्येय धोरणाची अंमलबजावणी होत असते. म्हणूनच संघराज्य स्वरूपात कालमानापरत्वे बदल होतात. राजकीय विचारसरणी, समाजाचा मानसिक पैलू, राजकीय प्रक्रिया, विविध राजकीय पक्षाची ध्येय धोरणे, याचा संघराज्य घटनेच्या संदर्भात सातत्याने अभ्यास करणे असा संघराज्यवाद या संकल्पनेचा आशय आहे. केवळ संवैधानिक तरतुदीच्या आधारे निष्कर्ष काढणे एकांशी ठरेल. १९६७ नंतर काही घटक राज्यात प्रादेशिक राजकीय पक्षाचा सरकारे अस्तित्वात आली व त्यांनी केलेल्या मागण्यांमुळे 'सरकारीया आयोगाची' निर्मिती केली. राष्ट्रीय पातळीवरील नेतृत्वाला प्रादेशिक समस्या, अस्मिता यांचा विचार गंभीरतेने व्हायला लागला. प्रादेशिक पातळीवरील

प्रादेशिक पक्षांच्या सत्तेला घटक पातळीवर उपक्रमशिलतेला चालना मिळाली. नियोजन प्रक्रियेत पूर्वीपेक्षा सक्रीय सहभागात वाढ झाली, त्यामुळे घटक राज्यांना अधिक स्वायत्तता मिळत आहे.

**निष्कर्ष**

भारत संघराज्य आहे हे घटनात्मक तरतुदीवरून जे निष्कर्ष काढल्या गेले त्यात कालमानापरत्वे बदल होत आहेत. सिध्दांत व व्यवहारातील तफावतीमुळे तणाव निर्माण होत असले तरीही सहकार्य व समन्वय साधल्या जात आहे. प्रादेशिक पातळीवरील शासन व केंद्र शासनात समन्वय दिसून येते. केंद्र सरकार व राज्य सरकारने परस्पर सहकार्याने बऱ्याच गोष्टी कराव्यात अशी घटनेची अपेक्षा आहे. राज्यांनी आपले स्थान दुय्यम आहे असे समजण्यापेक्षा केंद्र व राज्य एक सहार्यांची साखळी आहे असे मान्य करणे योग्य ठरेल. सामंजस्य व लोकशाही प्रगल्भ करण्याच्या पार्श्वभूमीवर तणावांकडे पाहिले पाहीजे. केंद्र व राज्यात वेगवेगळ्या राजकीय पक्षाची सरकारे असतील तरच वाद निर्माण होतात असे नाही, तर पक्षीय नेतृत्व किती सक्षम आहे यावर त्या संबंधाचा पोत ठरतो. सहकारी संघराज्यवाद एक उत्तम व्यवस्था आहे. केंद्र व राज्य सरकार पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जावून नीती आणि प्रशासनिक व्यवस्थेत एकरूपता स्थापीत करण्याचा प्रयत्न करतील, त्यामुळे भारतात एकता, अखंडता आधि बंधुत्वाची भावना वाढविण्यास उपयुक्त ठरेल. गेल्या अनेक दशकामधील संघराज्य वादाचे स्वरूपाचे विश्लेषण केल्यास हे स्पष्ट होते की भारतात सहकारी संघवाद विकसित झाला आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**


- https://kartavyasadhana.in
- https://www.loksatta.com
- https://www.bbc.com

१. लोटे रा.ज. 'भारतीय शासन व शासन व्यवस्था' पिंळापुरे अँड कं. नागपुर-२०११

२. भोळे, भाष्कर लक्ष्मण, 'भारतीय राज्यव्यवस्था' पिंळापुरे अँड कं. नागपुर-१९८७

३. बाचल, वि.मा. 'भारतीय राज्यघटना आणि राजकीय व्यवहार' के. सागर, पुणे-२०१

४. भोळे, भा.ल. देशपांडे वा.र. 'भारताचे शासन आणि राजकारण' पायल प्रकाशन, नागपूर,